

कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान् सर्वत्र पूज्यते

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine June 2024 - Pages - 36

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे

कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७५ * अंक ८ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




दि. १२ मे २०२४ रोजी संस्थेच्या ११५ व्या वर्धापन दिनी
कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण प्रसंगी
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे,
कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी,
संचालक श्री. रमेश कुलकर्णी, श्री. आनंद कुलकर्णी, श्री. सुनिल रेडेकर, श्री. राजेंद्र कडुसकर,
संचालक श्री. अमोल जोशी, देणगीदार श्री. सदानंद केंघे,
सेवक श्री. नंदकुमार ब्रह्मे आणि श्री. संजय बांगर

## ✻ संस्था ११५ वा वर्धापन दिन क्षणचित्रे ✻



श्रीराम लक्ष्मणास अभिषेक करताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



श्रीराम लक्ष्मणाची आरती करताना
देणगीदार श्री. सदानंद केंघे







कुलगुरु कै. दादासाहेब केतकर आणि गुरुवर्य कै. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना
संस्था पदाधिकारी समवेत संचालक



ब्रह्मवृंदाकडून मंत्राक्षता स्वीकारताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे




ब्रह्मवृंदास गुलाबपुष्प, पेढा व दक्षिणा देऊन
आशीर्वाद घेताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ

संपादकीय

# शिवराज्याभिषेक जून महिन्याचे वैशिष्ट्य

साधारणतः जून महिना हा नवनव्या आशा, आकांक्षा आणि स्वप्न पाहण्याचा महिना. मे महिन्याच्या अखेरीपासून किंवा जून महिन्यात उन्हाच्या तावाने रखरखीत, उजाड, संत्रस्त आणि त्राहिमाम् झालेल्या वसुंधरेला वर्षाराणी आपल्या कृपावर्षावाने नवजीवन देते. पाहता पाहता साऱ्या सृष्टीचे रूपवैभव उमलते, बहरते आणि जीवनात येणाऱ्या समृध्दीच्या चाहुलीने मानवी मन भविष्याची सुंदर स्वप्ने रंगविण्यात दंग होते. त्याच सुमारास शैक्षणिक नववर्षाचीही सुरुवात होते. शाळाप्रवेशाची लगबग संपलेली असते. समस्त विद्यार्थी आणि पालकवर्ग शिक्षणामुळे साकार होणाऱ्या उज्ज्वल भविष्याची नवनवीन स्वप्ने रंगवण्यात मश्गुल असतो. उद्याच्या जीवनसमृध्दीचे आणि सुबत्तेचे पहिले पाऊल म्हणून शिक्षणपर्वाची वाटचाल करताना स्वतःला धन्य समजतो. अशा या जून महिन्यातच या वर्षी अनेक शतकांपूर्वी आपल्या समाजजीवनातील एक गौरवशाली आणि अभिमानास्पद घटना जेष्ठ शुध्द १३ शालिवाह शके १५९६ रोजी साकार झाली होती आणि ती म्हणजे शिवराज्याभिषेकाची. या वर्षी शिवराज्याभिषेक तिथी दिनांक २० जून २०२४ रोजी येत आहे.

चिकणमातीच्या थंडगार गोळ्याप्रमाणे चेतनाहीन जीवन जगणाऱ्या, कडेकपारीतून दिवाभिताप्रमाणे जीवन जगणाऱ्या महाराष्ट्राच्या जीवनात स्वाभिमानाने आणि ताठ कण्याने जगण्याची जिद्द आणि प्रेरणा श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने साकार झाली.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राजा हा पृथ्वीचा उपभोगशून्य स्वामी आहे' हे तत्त्व आपल्या या अभिषेकाने रुजविले. वैयक्तिक सत्तालोलुपता किंवा सुखोपभोगाच्या हव्यासापोटी श्री शिवछत्रपतींनी राज्य निर्मिती केली नाही. 'मोडिली - मांडिली क्षेत्रे' हेच राजांचे ध्येय होते. त्यांना स्वराज्य स्थापनेच्या आपल्या या प्रयत्नातून 'आनंदवनभुवनी' साकारायचे होते. म्हणूनच त्यांनी चार पातशाह्या उरावर भाले रोखून उभ्या असतानाही, त्यांना पराभूत करून महाराष्ट्र धर्माची स्थापना केली. त्यामुळे सुलतानांची मिरास संपली. देवगिरी, विजयनगरादी चिरफाळलेली सिंहासने त्यानिमित्ताने रायगडावर सांधली गेली. सिंहासनाधीश्वर होण्यात श्रीमहाराजांचा हेतू 'सद् रक्षणाय' हाच होता.

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजामि अहम् ।।
परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।'

हे भगवान श्रीकृष्ण वचनच श्री शिवछत्रपतींच्या या राज्याभिषेकाने साकार झाले.

राज्याभिषेक सोहळ्याच्या धामधुमीतही राजे आपले राजकारण आणि प्रजाहितदक्षता विसरले नव्हते. प्रजाहितदक्ष राजे राज्याभिषेक उपचाराला केवळ कर्तव्यभावनेने सामोरे जात होते. राज्याभिषेकाच्या धामधुमीच्या काळातही राज्यरक्षण, राज्यसंवर्धन आणि प्रजारंजन या आपल्या ब्रीदापासून राजे तसूभरही हटले नव्हते.

राज्याभिषेक तयारी काळातही राजांनी चिपळूण येथील आपल्या छावणीची पहाणी केली होती. वाईजवळचा केळंजागड जिंकला होता. सदैव प्रजेच्या कल्याणाबाबत जागरुक असलेल्या राजांनी 'रयतेस काडीचा आजार द्यावया गरज नाही. कोण्हावरी जुलूम अगर कोण्हावरी कलागत कराया गरज नाही', अशी आपल्या फौजेला सक्त ताकीद दिली होती. सेनाधिकाऱ्याने रयतेच्या दारातील तुळशीपत्रालाही खुडू नये कारण, अधिकाऱ्याने तुळशीपत्र तोडले तर, बाकीची मंडळी झाडही ठेवणार नाहीत. यास्तव अधिकारी वर्गाने विशेष जबाबदारीने वागावे हा राजांचा आग्रह असे. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र', 'साहुकार (व्यापारी) म्हणजे राज्याची शोभा' अशा सूत्रमय वाक्यांतून राजांनी आपली

राज्यकारभार नीती स्पष्टपणे मांडली होती. स्वराज्य निर्मिती आणि दूरदृष्टीने त्याची केलेली चिरेबंद बांधणी पाहून,

**' स्वप्नी जे देखिले रात्री । ते ते तैसेचि होतसे ।।'**

असे श्री शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे वर्णन श्री रामदासस्वामी करतात. शिवरायांनी स्थापिलेल्या स्वराज्याचे व राजांच्या पराक्रमाचे आणि दूरदृष्टीचे भरभरून कौतुक करतात.

आपल्या या स्वराज्य स्थापनेबरोबरच श्री महाराजांनी केलेले आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी घडविलेले जनमानस. स्वदेश आणि कर्तव्यरूपी स्वधर्मासाठी लढण्याची जिद्द राजांनी आपल्या समाजात रुजवली.

**' मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।'**

या राजांच्या धोरणामुळे महाराष्ट्रात 'गवतालाही भाले फुटले'. चंद्रकोर अस्तंगत झाल्यावरही तिच्या तेजाने दशदिशा मुखरित होतात. चैतन्यमय होतात. त्याचप्रमाणे शिवरायांच्या पराक्रमाने आणि कर्तृत्वाने मराठी मानस मुखरित होवो व प्रत्येक नागरिकास राज्याप्रतीच्या कर्तव्याचे भान येवो ही श्रीचरणी प्रार्थना.

**जय शिवराय । जय महाराष्ट्र ।**



दि. २८ मे २०२४
स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

## वाढत्या वयाची लक्षणे

जन्माला आलेली व्यक्ती वाढत असते. बाल्य, शैशव, कुमारावस्था, तारुण्य, प्रौढत्व, वार्धक्य अशा जीवनाच्या निरनिराळ्या अवस्था आहेत. त्यातून आपण प्रत्येक जण जात असतो.

एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाताना तीन प्रकारचे फेरफार होतात. शारीरिक, बौद्धिक व मानसिक. प्रारंभी शरीराची वाढ होते, पुढे पुढे दुर्बलत्व येत जाते. हा सामान्य नियम. या वाढीवर किंवा नैसर्गिकपणे येणाऱ्या कमकुवतपणावर आपला फारसा ताबा नाही.

शरीराप्रमाणे बुद्धीचीही वाढ होत जाते. ती बरीच वर्षे कायम राहते. पुढे बुद्धीही दुर्बल होत जाते.

तिसरे मन. याचीही हळूहळू वाढ होत जाते; पण याची वाढ करणे व ते सतत विकासक्षम ठेवणे व्यक्तीच्या हातात आहे. प्रारंभी प्रारंभी मनुष्य स्वार्थी, संतापी, चिडखोर, असहिष्णू असतो. तो हळूहळू विचाराने उदार आणि संयमशील होऊ शकतो. होतोच असे नाही. प्रयत्नाने होण्याची शक्यता आहे. आणि तसा तो होणे हेच मी वाढीचे लक्षण समजतो.

बहुसंख्य लोक शरीराने वाढतात; पण मनाने वाढत नाहीत. मोठ्या व धिप्पाड शरीराचे लोक मनाने स्वार्थी, क्षुद्र वृत्तीचे व संयमहीन पाहिले की, मला त्यांची कीव येते.

बुद्धीनेही लोक खूप वाढतात. विद्वान होतात, पदव्या मिळवतात, विद्वत्तेने मिळणारी मोठी स्थाने मिळवितात; पण मनाने बिचाऱ्यांची वाढ झालेली नसते. स्वार्थ, क्षुद्र मनोवृत्ती, संतापीपणा, चिडखोरपणा, असहिष्णुता-हे अविकसित प्राण्याचे दुर्गुण या विद्वानांच्या ठिकाणी पाहिले म्हणजे मला वाटते - हे लोक बुद्धीने वाढले; पण मनाने खुजेच राहिले!

बुद्धी व मन यांचा सतत विकास होत राहिला तर वाढत्या वयाचा फायदा झाला. नाहीतर आयुष्य वाया गेले.

**डॉ. ग. श्री. खैर (मे १९५५)**

# संस्था मुख्यालय

## दि. १२ मे २०२४ संस्थेचा ११५ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी

समाजातील गरीब, गरजू व अनाथ विद्यार्थ्यांचे पालन - पोषण, शिक्षण, संवर्धन व पुनर्वसन करुन त्यांना त्यांच्या पायावर उभे करुन सुजाण नागरिक घडविण्याचे मोलाचे कार्य करणाऱ्या देशात व महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त पुणे विद्यार्थी गृह संस्थेचा ११५ वा वर्धापनदिन आज दि. १२ मे २०२४ रोजी सकाळी संस्थेच्या मुख्यालयात संपन्न झाला.

लोकसभा मतदान केंद्रासाठी संस्थेच्या मुख्यालयाच्या आवारातील जागा दि. १२ मे व दि. १३ मे २०२४ रोजी शासकीय नियमाप्रमाणे ताब्यात द्यावयाची असल्यामुळे प्रतिवर्षाप्रमाणे सायंकाळचा स्वागत समारंभ आयोजित करता आला नाही.

संस्थेच्या मुख्यालयात दि. १२ मे २०२४ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचे शुभहस्ते आवारातील श्रीराम - लक्ष्मणाच्या मूर्तीवर पवमानाचे आवर्तन करून अभिषेक, यथासांग पूजा व आरती करण्यात येऊन मंगलमय वातावरणात कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

श्रीराम मंदिरात कुलगुरु कै. दादासाहेब केतकर व शिक्षणमहर्षी डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांच्या फोटोस कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच आवारातील कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांच्या पुतळ्यासही कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि उपकार्याध्यक्ष श्री. एस्. एम्. जिर्गे यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सकाळी ९.३० ते ११.०० या वेळेत श्रीराम मंदिरात ब्रह्मवृंदाकडून अथर्वशीर्ष, श्रीरामरक्षा, श्रीसूक्त, पुरुषसूक्त, शांतीपाठ, नवग्रह सूक्त व वेदपठण इ. वैदिक मंगल (वेद घोष) कार्यक्रम संपन्न झाला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी ब्रह्मवृंदाकडून मंत्राक्षतांचा स्वीकार केला. ब्रह्मवृदांना गुलाबपुष्प, पेढे व दक्षिणा देऊन त्यांचा आशीर्वाद घेतला.

या प्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक, देणगीदार श्री. सदानंद केंघे, माजी विद्यार्थी, विविध विभागातील सेवक बंधुभगिनी उपस्थित होते. संस्था संचालक व सेवकांनी या प्रसंगी देणगी देऊन संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

संस्थेचे ज्येष्ठ मा. वि. श्री. अशोक कस्तुरे हे बदलापूर, ठाणे येथून वर्धापन दिनी शुभेच्छा व देणगी देण्यासाठी आवर्जून उपस्थित राहिले त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. ***

## पंचवटी नाशिक शाखेचा ९८ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**संचालक श्री. अमोल जोशी**

दि. १७ मे २०२४ रोजी पुणे विद्यार्थी गृह, नाशिक शाखेचा ९८ वा वर्धापन दिन साधेपणाने साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते सत्यानारायणाची पूजा संपन्न झाली. या प्रसंगी देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर या उपस्थित होत्या. श्रीमती गंगुताई धामणकर यांनी कार्याध्यक्ष आणि संचालक यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

समाजातील शैक्षणिक, समाजिक आणि राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनी तसेच संस्थेचे देणगीदार, माजी विद्यार्थी, हिंतचिंतक यांनी दूरध्वनी, व्हॉट्सॲप, ईमेल अशा विविध संपर्क माध्यमातून सदिच्छा - शुभेच्छा संदेशाद्वारे संस्थेविषयीच्या आपल्या भावना संस्था संचालक यांच्या पर्यंत पोहचविल्या.

या कार्यक्रम प्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. सुनिल रेडेकर, श्री. राजेंद्र कडुसकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कै. म. बा. उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालयातील सेवकांनी योगदान दिले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी संस्था पदाधिकारी, संचालक, देणगीदार गंगुताई धामणकर व उपस्थित सेवकांचे आभार मानले.

***

## महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

### महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन

दि. १ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून संचालक डॉ. राजेंद्र संपत कांबळे हे उपस्थित होते. तसेच कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, महाराष्ट्र मुद्रण शाळेचे प्राचार्य पी. व्ही. शिंदे, शिशुनिकेतन मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे, मुक्तांगण इंग्लिश स्कूल, सदाशिव पेठ शाखेच्या मुख्याध्यापिका सौ. शिल्पा गायकवाड, प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

ध्वजवंदनासाठी रिपोर्टिंग अध्यापक श्री. प्रशांत बोंबलट यांनी केले. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर सामूहिक राष्ट्रगीत व महाराष्ट्र राज्यगीत गायन झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य वि. पां. गावडे यांनी केले. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांचे हस्ते प्रमुख पाहुणे संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांचा सत्कार पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन याबद्दल माहिती सांगितली. डॉ. राजेंद्र कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी उपस्थितांकडून मतदान शपथ म्हणवून घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. उपस्थितांचे आभार अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी मानले. वंदेमातरम या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या प्रसंगी सुंदर फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले होते, तर रांगोळी

अध्यापिका सौ. सविता जगताप, सौ. सुनंदा भाईक यांनी काढली होती.

**मार्च २०२४ एस. एस. सी. निकाल**

मार्च २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक विभागातर्फे घेण्यात आलेल्या इ. १० वी (एस. एस. सी. बोर्ड) परिक्षेस विद्यालयाचे एकूण ४३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि सगळेच्या सगळे विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ४३ विद्यार्थ्यांपैकी १२ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. १७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. १४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. विद्यालयाचा निकाल १००% लागला. प्रथम पाच क्रमांकाने उत्तीर्ण झालेले विद्यार्थी खालील प्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|
| कु. भंडारी अभिजित अशोक | ९४.६० | प्रथम |
| कु. ढमढेरे साहिल राजेंद्र | ९०.८० | द्वितीय |
| कु. सवासे जयदीप भगवान | ८८.८० | तृतीय |
| कु. मोरे ओम सोमनाथ | ८७.४० | चतुर्थ |
| कु. कुलकर्णी विद्याधर गोपाळ | ८६.८० | पाचवा |

***

## ✻ नम्र विनंती ✻

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

**ई-मेल : pvgheadoffice@gmail.com**

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३**

**मोबाईल क्रमांक : ९६९९८७६२०३**

**राजेंद्र बोऱ्हाडे**
**कार्याध्यक्ष**

**✻ महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ३० ✻**



प्रमुख पाहुणे संचालक डॉ. राजेंद्र संपत कांबळे, यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत संचालक श्री. रमेश कुलकर्णी आणि प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे ↓

दि. १ मे २०२४ महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन प्रसंगी ध्वजारोहणानंतर राष्ट्र ध्वजास सलामी देताना प्रमुख पाहुणे संचालक डॉ. राजेंद्र संपत कांबळे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, प्राचार्य श्री. व्ही. पी. गावडे, प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे, मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे आणि मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे ↑



## विद्याभवन-घाटकोपर, मुंबई शाखा

**विद्याभवन संकुल**

**महाराष्ट्र दिन शिक्षकांच्या कलाविष्कारात रंगला महाराष्ट्र दिन सोहळा**

पुणे विद्यार्थी गृह, विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर पूर्व, मुंबई येथे आज दि. १ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिन सोहळा उत्साहात साजरा झाला.

मराठी व संस्कृत भाषा तज्ज्ञ, निवृत्त उपप्राचार्य श्री. गिरीश जोशी, त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. रेवा गिरीश जोशी यांचेसह कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तसेच या प्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, अनुसंधान समिती सदस्य श्री. कृष्णाजी शिरकांडे व शालेय विभागाचे सर्व मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सकाळी ७.१५ वाजता शालेय प्रांगणात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झेंडा वंदन करण्यात आले. राष्ट्रगीत, झेंडागीत व महाराष्ट्रगीत सादर केल्यानंतर शिक्षकांच्या विविध कलाविष्कारांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली.

प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी यांनी आपल्या मनोगतपर भाषणात प्राचीन काळातील महाराष्ट्र, त्यातील विविध प्रथा, परंपरा, महानुभाव पंथाची शिकवण, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, स्त्री स्वातंत्र्य, संत साहित्य, संस्कृत साहित्य, प्राचीन दंत कथा ते अर्वाचीन साहित्याची माहिती रंजकपणे सांगून, महाराष्ट्राच्या जीवनातील एकसूत्रता अधोरेखित केली आणि त्या द्वारे सांस्कृतिक वारसा कसा जोपासला जात आहे ते स्पष्ट केले.

शिक्षकांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास, भक्ती गीत, लोकनृत्य, अभंग गायन आणि समूहगान असे विविध कलाविष्कार सादर करण्यात आले. या कार्यक्रमाने अवघे सभागृह मंत्रमुग्ध झाले. या कलाविष्काराबद्दल श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी सर्व शिक्षकांचे विशेष कौतुक केले व त्यांना उन्हाळी सुट्टीच्या शुभेच्छा दिल्या.

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती योगिनी पोतदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. विद्यालयातर्फे प्रमुख पाहुण्यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. हेमलता सुर्वे यांनी केले. सौ. मृदुला धावडे यांनी आभार प्रदर्शन केले. वंदे मातरम् या राष्ट्रगानाने कार्यक्रम संपन्न झाला. ***

## अभिनंदनीय



कु. रोहन सिरसट

**'वासुदेव गोपाळ कोकजे सदाचार वसतिगृहातील' विद्यार्थी कु. रोहन प्रकाश सिरसट याने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या 'पोलीस उपनिरीक्षक संयुक्त गट ब' या पदासाठी यश संपादन केले.**

**कु. रोहन सिरसट याने वसतिगृहामध्ये जून २०१९ मध्ये प्रवेश घेतला होता. त्याने कुठलाही क्लास न लावता सेल्फ स्टडी करुन हे यश संपादन केले. सन २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी नुकतीच प्रसिद्ध झाली असून त्यामध्ये त्याने राज्यात ३४वी रँक मिळवून यश संपादन केले आहे. या सर्व यशासाठी त्याला संस्थेचे पदाधिकारी व संचालक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.**

**कु. रोहन सिरसट याचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ***

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी** **मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

**मतदान जनजागृती**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदान जनजागृतीसाठी दि. २५ एप्रिल २०२४ रोजी पंचवटी परिसरात प्रत्यक्ष गृहभेटी देऊन मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांनी मतदान करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती केली. दि. २६ मार्च २०२४ रोजी इयत्ता पाचवी ते नववी च्या विद्यार्थ्यांची रांगोळी आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आली .

दि. ३० मार्च २०२४ रोजी प्रभात फेरी काढण्यात आली. इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांनी घोषणा फलक तयार केले. ढोल ताशाच्या गजरात घोषणा देऊन नागरिकांमध्ये मतदान करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. प्रभात फेरी विद्यालय ते नागचौक - पंचवटी कारंजा - शनिचौक ते विद्यालय या परीसरातून काढण्यात आली. या प्रभातफेरी मध्ये मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी सहभागी झाले.

**कुलगुरू कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर जयंती**

दि. ९ एप्रिल २०२४ रोजी विद्यालयात कुलगुरू कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर जयंती साजरी करण्यात आली.

संचालक श्री. अमोल जोशी आणि मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कुलगुरू दादासाहेब केतकर यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी कुलगुरू दादासाहेब केतकर यांनी पुणे विद्यार्थी गृह संस्थावाढी साठी केलेल्या कार्याविषयी माहिती सांगितली. या प्रसंगी सर्व संस्था सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

दि.१४ एप्रिल २०२४ रोजी विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकवृंद यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**१ मे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन**

दि. १ मे २०२४ रोजी विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जेष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचा सत्कार केला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाचे महत्त्व सांगितले. सर्व शिक्षकांना गुलाबपुष्प देऊन महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सौ. तेजश्री जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. श्रीमती अर्चना केकाण यांनी सूत्रसंचालन केले.

**अभिनंदनीय**

विद्यालयातील शिक्षिका सौ. तेजश्री जोशी यांना महिला दिनानिमित्त इनरव्हीलक्लब तर्फे ''Woman Achiver Award'' देऊन सन्मानित करण्यात आले.

**सौ. तेजश्री जोशी यांचे संस्थेच्या आणि विद्यालयाचे वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन !**

***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

### प्राथमिक विभाग

**नमो चषक स्पर्धा**

हिरावाडी येथे आमदार श्री. राहुल ढिकले यांच्या तर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'नमो चषक कुस्ती स्पर्धेत' विद्यार्थी कु. रुद्र गायकवाड याने रौप्य पदक पटकावले.

**२१ मार्च वनदिन**

दि. २१ मार्च २०२४ रोजी शाळेत वनदिन साजरा करण्यात आला. आजच्या आधुनिकतेमुळे वनाचे प्रमाण कमी होत आहे. प्रगत राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक भरभराटीत समृद्ध वनांचा मोठा वाटा असतो. हवामान बदलामध्ये जंगले महत्त्वाची भूमिका बजावतात, अशी माहिती शिक्षिका कु. दर्शना सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

**२२ मार्च जलदिन**

दि. २२ मार्च २०२४ रोजी शाळेत जलदिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्त्व आणि पाणी बचतीचे मार्ग सांगण्यात आले. विनाकारण पाणी वापर करणे टाळणे, पाणी प्यायल्यावर शाळेतील नळ नीट बंद करणे, इत्यादी. स्वच्छ पाणी हा जीवनाचा अत्यावश्यक घटक आहे, त्यामुळे भविष्यातील सुरक्षिततेसाठी आपण पाण्याचे जतन करणे आवश्यक असल्याचे शिक्षिका सौ. पूजा देशपांडे यांनी जलदिन विषयी बोलताना सांगितले.

**शहिद दिन**

दि. २३ मार्च २०२४ रोजी शाळेत शहिद दिना निमित्त क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शिक्षिका सौ. हर्षदा सैंदाणे यांनी विद्यार्थ्यांना भगतसिंग, राजगुरू व सुखदेव आणि अशा अनेक क्रांतिकारकांनी देशासाठी दिलेल्या बलिदानाची माहिती सांगितली.

**जिम्नॅस्टिक् व ॲरोबिक स्पर्धा**

डेरवण, रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आलेल्या जिम्नॅस्टिक् व ॲरोबिक स्पर्धेत कु. आराध्य दिवेकर व कु. मृण्मयी दीक्षित इ. ४ थी आणि जान्हवी धिवरे इ. ५ वी यांनी सुवर्णपदक व रौप्यपदक मिळविले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

**कुलगुरू दादासाहेब केतकर जयंती**

दि. ९ एप्रिल २०२४ रोजी कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांची जयंती पुणे विद्यार्थी गृह म्हसरूळ शाखेत संपन्न झाली. या प्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, धामणकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात कुलगुरु दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाली. नंतर प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला व श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांच्या अमूल्य कार्याची माहिती व त्यांचा जीवन प्रवास याविषयी सौ. वैशाली मुंदाणकर यांनी उपस्थितांना माहिती दिली. सर्व शाखाप्रमुखांनी दादांचे कार्य पुढे अविरतपणे चालू ठेवण्याचा संकल्प केला.

**महात्मा फुले जयंती**

दि. १२ एप्रिल २०२४ रोजी महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा

वैद्य यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पहार अर्पण केला. शिक्षिका सौ. रुपाली चव्हाण यांनी महात्मा फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांना सांगितली.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

दि. १४ एप्रिल २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. शिक्षिका सौ. तेजस्विनी गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय व शैक्षणिक कार्याची माहिती दिली.

### २२ एप्रिल वसुंधरा दिन

दि. २२ एप्रिल २०२४ रोजी वसुंधरा दिन साजरा करण्यात आला. सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी वसुंधरेला प्रदूषणापासून वाचवू अशी शपथ घेतली. पृथ्वीला सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने झाड लावून त्याचे जतन करावे, आपल्या सभोवतालच्या परिसरात स्वच्छता राखावी. तसेच शेतकरी बांधवांनी शेतात जैविक खतांचा वापर करावा अशी माहिती विद्यार्थ्यांना शिक्षक श्री. देवेंद्र कुलकर्णी यांनी सांगितली.

***

### ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



दि. १ मे २०२४
महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन करताना प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी, समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, अनुसंधान समिती सदस्य श्री. कृष्णाजी शिरकांडे आणि उपस्थित मान्यवर



प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि अनुसंधान समिती सदस्य श्री. कृष्णाजी शिरकांडे, सौ. रेवा गिरीश जोशी

# विद्याभवन-नेरुळ, नवी मुंबई शाखा

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### चित्रकला स्पर्धा

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात 'कॅमल आर्ट कॉन्टेस्ट' यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादित केले. या विद्यार्थ्यांना कॅमल ऑईल पेस्टल बॉक्स आणि फेविकॉल बॉटल बक्षीस स्वरूपात देण्यात आले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| **गट ब** | |
| कु. स्पंदन नवीन भगत | १ली |
| कु. अहिल आबेद शेख | २री |
| **गट क** | |
| कु. दर्शन मनोज शाहू | ३री |
| कु. शुभ अरुण पवार | ४थी |

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

दि. १३ एप्रिल २०२४ रोजी विद्याभवन शाळेच्या सभागृहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा मुळीक, श्रीमती श्रीजा नायर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांवरील अन्यायाला वाचा फोडली तसेच दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली, महिला आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेले शिक्षण, त्यांच्या पदव्या याबद्दल शिक्षिका श्रीमती सुरबीला गोपालकृष्णन यांनी माहिती दिली. प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि राजकीय क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल माहिती दिली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती वीणा जगताप यांनी केले.

### सुपर मॉम टॅलेंट स्पर्धा

दि.१४ एप्रिल २०२४ रोजी चाईल्ड ड्रीम बुस्टर हब यांच्यातर्फे 'सुपर मॉम टॅलेंट स्पर्धेचे' आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. यामध्ये श्रीमती फरहाना चौगुले यांनी 'जिंदगी' या कवितेचे सादरीकरण केले. या स्पर्धेत त्यांनी प्रथम क्रमांक संपादित केला. संस्थेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन!

### सेवापूर्ती समारंभ

दि. ३० एप्रिल २०२४ रोजी सहशिक्षिका श्रीमती सुरबीला गोपालकृष्णन यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमास कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, श्रीमती सुरबीला गोपालकृष्णन व त्यांचे कुटुंब, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, समन्वयक आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. सरस्वती व गणेश पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते सत्कारमूर्ती श्रीमती सुरबीला गोपालकृष्णन यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सोबतच त्यांचे यजमान श्री. गोपालकृष्णन यांचेही शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर प्रत्येक विभागाच्या शिक्षकांनी श्रीमती सुरबीला यांना भेटवस्तू देऊन त्यांचे भावी आयुष्य हे आरोग्यदायी व्हावे यासाठी शुभेच्छा दिल्या. श्रीमती सुरबीला यांनीही आपली आठवण म्हणून शाळेला भेटवस्तू दिली. तसेच श्रीमती सुरबीला गोपालकृष्णन आपले मनोगत व्यक्त करताना या शाळेने खूप कमी वेळात मला आपलेसे केले, शाळेतील प्रत्येक व्यक्तीकडून मला प्रेमळ वागणूक व सहकार्य मिळाले. ही शाळा म्हणजे माझ्यासाठी माझे दुसरे घरच आहे, असे सांगितले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ,

मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षक श्री. अविनाश कुलकर्णी, श्रीमती ममता राक्षे, श्रीमती पौर्णिमा खरजे, श्रीमती राखी लोणकर, श्रीमती प्रिया तिय्यर, श्री. संकेत थळे यांनीही श्रीमती सुरबीला गोपालकृष्णन यांच्यासोबत काम करताना आलेले अनुभव आपल्या मनोगतातून व्यक्त केले. श्रीमती सुरबीला गोपालकृष्णन या अतिशय कष्टाळू, विद्यार्थीप्रिय, मनमिळावू शिक्षिका आहेत. त्यांचा शालेय कार्यातील नीटनेटकेपणा वाखाणण्या सारखा आहे. अशा शिक्षकांनी विद्यार्थ्यांना व शाळेला जिव्हाळा लावला. त्यांचे हस्ताक्षर सुंदर, टंकलेखना सारखे आहे. त्याचबरोबर त्यांच्या उर्वरित मनोकामना पूर्ण करण्यासाठी त्यांची जी काही 'बकेट लिस्ट' असेल ती त्यांनी पूर्ण करावी, त्यांचे पुढील आयुष्य आरोग्यदायी व्हावे, असे बोलून कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर श्री. गोपालकृष्णन यांचीही नेहमी शाळेच्या मेंटेनन्सच्या कामात तांत्रिकदृष्ट्या मदत होत होती. याबद्दल सरांनी त्यांचेही आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्रीमती फरहाना चौगुले यांनी तर, आभार प्रदर्शन श्रीमती प्रिया तिय्यर यांनी केले. वंदेमातरम्‌ने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

# विद्याभवन माध्यमिक इंग्रजी शाळा

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. श्रीजा बा. नायर**

### कनक प्रतिष्ठान

कनक प्रतिष्ठान आयोजित पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती सराव परीक्षेत पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. मिहिर पंढरीनाथ मिरजे | ५वी |
| कु. श्रीया सुरज धांदरुट | ५वी |
| कु. भूमी प्रकाश शीतकर | ५वी |
| कु. आस्था प्रविण केळस्कर | ५वी |
| कु. पूर्वी प्रफुल्ल शिंदे | ५वी |
| कु. आर्या सागर नाक्ती | ८वी |
| कु. शिवकृष्णा किशोरकुमार पुचा | ८वी |
| कु. सुहानी प्रसन्नकुमार कांबळे | ८वी |
| कु. अली अलमिनाखातून खुशबरअली | ८वी |
| कु. अनघा अतुल भातमारे | ८वी |

### ऑलिम्पियाड परीक्षा २०२४

विज्ञान विषयाची ऑलिम्पियाड परीक्षा घेण्यात आली. प्रथम फेरीमध्ये विद्यार्थी कु. स्वराज संदीप जगदाळे इ. ८वी ब याने सुवर्ण पदक प्राप्त केले.

### सदिच्छा भेट

दि. २.४.२०२४ रोजी विद्याभवन नेरुळ संकुलास हितचिंतक व देणगीदार श्रीमती गंगूताई सदाशिव धामणकर व श्रीमती सिंधुताई सदाशिव धामणकर (नाशिक) यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. अमोल जोशी, अनुसंधान समिती सदस्य प्रा. कृ. ना. शिरकांडे, सौ. कल्पना शिरकांडे, सौ. संगीता बोऱ्हाडे, समन्वयक श्री. पां. बा. मुळीक, सर्व विभागाच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

दि. १३.४.२०२४ रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांची जयंती विद्याभवनच्या सभागृहात मोठ्या उत्साहात साजरी केली. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. श्रीमती सुरबीला गोपालकृष्णन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी उपस्थितांना माहिति सांगितली. प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. श्रीमती वीणा जगताप यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

**संस्कार शिबिर**

दि. १८.४.२०२४ रोजी विद्याभवनच्या सभागृहात गायत्री परिवाराचे श्री. के. एल. मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ६वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन केले. याप्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, गायत्री परिवाराचे श्री. अशोक खंडेलवाल, श्री. सत्यपाल अग्रवाल, श्रीमती कुमकुम कन्सल, श्रीमती अमिता गुप्ता, श्रीमती स्नेहा नांदिवडेकर, श्रीमती निलम गावंड शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी श्री. के. एल. मोदी यांनी 'संकल्प की महान शक्ति' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी ABP लक्षात ठेवण्यास सांगितले, म्हणजे Always Be Positive, बच्चे धरती के सितारे, घर की शोभा, माँ-बाप के सपने, समाज की आशाएँ, देश का भविष्य है असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गायत्री परिवाराचे श्री. अशोक खंडेलवाल यांनी केले.

**अभिनंदन वार्ता**

आर्ट ऑफ लर्निंग फाउंडेशन तर्फे नवराष्ट्र १७ वी नॅशनल योगासन चॅम्पियनशिप २०२४ स्पर्धा न. मुं. म. पा. शाळा क्र. १०१, सेक्टर १, शिरवणे, नेरुळ, नवी मुंबई येथे शनिवार दि. २७ एप्रिल २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत श्री. जगन्नाथ मच्छिंद्र कोळी यांनी ट्रॅडिशनल फेरीत ई गटात तृतीय क्रमांक पटकाविला. त्यांना प्रमुख अतिथी श्री. मुकेश तनेजा (माजी जिल्हा गव्हर्नर तसेच सिडको एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर) यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

**उन्हाळी शिबिर**

दि. १५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२४ या दरम्यान शालेय क्रीडांगणावर विद्यार्थ्यांना विविध नावीन्यपूर्ण खेळांचे प्रशिक्षण क्रीडा शिक्षक श्री. सुहास राउळ व प्राथमिक इंग्रजी विभागाचे सहाय्यक शिक्षक श्री. संकेत थळे यांनी दिले. दि. ३० एप्रिल २०२४ रोजी क्रीडा शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांना योग विद्यानिकेतन, वाशी येथील श्री. दुर्गादास सावंत, शबाना खान, सरस्वती श्रीराम, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ व श्रीमती श्रीजा नायर यांच्या शुभहस्ते प्रशस्तिपत्रक व टोपी देऊन गौरविण्यात आले.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**होळी**

दि. २३ मार्च २०२४ रोजी होळी सण साजरा करण्यात आला. शाळेच्या मैदानावर होळी उभारण्यात आली होती. रंगीबेरंगी पोषाख घातलेले पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागाचे विद्यार्थी अतिशय उत्साहाने त्यामध्ये सहभागी झाले होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, समन्वयक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते होळीची पूजा करुन, नारळ व नैवेद्य अर्पण करण्यात आला. याप्रसंगी वाईट प्रवृत्ती, वाईट सवयी, नकारात्मक गोष्टी, संकटे व आळस यांचे दहन करण्यासाठी होळी पेटविण्यात आली. यानिमित्ताने सर्व विद्यार्थ्यांना शिक्षकांनी नैसर्गिक रंग लावून होळीच्या शुभेच्छा दिल्या.

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापक : श्री. गोरख कदम**

### दादासाहेब केतकर जयंती

दि. ९.४.२०२४ रोजी कुलगुरु दादासाहेब केतकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दादासाहेबांच्या कार्याला उजाळा दिला. कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांनी लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्रीचे पालन करत राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी शिक्षण क्षेत्रात खूप अनमोल योगदान दिले. सन १९०९ मध्ये पुणे विद्यार्थी गृहाच्या स्थापनेनंतर गरीब आणि होतकरु विद्यार्थ्यांसाठी विविध योजना आणल्या. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांनी प्रत्यक्ष भेटून पुणे विद्यार्थी गृहाच्या कार्याची प्रशंसा केली. पंडित मदन मोहन मालविय, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी देखील संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले होते. श्रीमती स्वाती मोटे, श्रीमती सुलेखा खराडे व श्रीमती मनिषा मुळे यांनी देखील कुलगुरु दादासाहेब केतकर यांचा जीवनपट उलगडला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती सुवर्णा मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती शोभा लवटे, श्रीमती अस्मिता सलगर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अविनाश कुलकर्णी यांनी केले.

### विद्यार्थ्यांनी केली मतदान जनजागृती

इंग्रजी व मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य, रॅली तसेच विविध स्पर्धा घेऊन मतदान जनजागृती केली. शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांकरीता 'जागा हो मतदार' या विषयांतर्गत जनजागृती करणाऱ्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी व मराठी विभागाच्या आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा आणि गीतगायन स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बॅन्ड पथकास सोबत घेऊन विविध घोषणा देत पथनाट्य व रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी 'तुमचे मत, तुमचा अधिकार', 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो', 'नवे वारे, नवी दिशा, मतदानच आहे उद्याची आशा', 'चला मतदान करु या लोकशाही रुजवू या' अशा घोषणा दिल्या. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती सुवर्णा मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, ज्येष्ठ शिक्षिका राजकुमारी इंदलकर, श्री. जगन्नाथ कोळी, श्री. रमेश राऊत, श्रीमती कविता तेंडुलकर यांनी या उपक्रमाचे नियोजन केले.

### स्व. डॉ. शंकर पांडुरंग किंजवडेकर जन्मदिवस - संस्कार दिन

दि. १० मार्च २०२४ रोजी विद्याभवन संकुलात स्व. डॉ. शंकर पांडुरंग किंजवडेकर यांचा जन्मदिवस 'संस्कार दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी स्व. डॉ. शंकर पांडुरंग किंजवडेकर यांच्या बद्दल उपस्थितांना माहिती दिली. समाजसेविका श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांनी डॉक्टरांच्या नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्व या गुणांविषयी माहिती दिली व या कृतज्ञतादर्शक उपक्रमासाठी शाळेचे कौतुक केले. बी.ए.आर.सी.चे निवृत्त वैज्ञानिक श्री. के. एल. मोदी यांनी संस्कारांची आवश्यकता, प्रकार, उपयोग स्पष्ट करताना दैनंदिन जीवनातील विविध उदाहरणे दिली. कु. उल्का झगडे, कु. मानसी गुळवे, कु. दीक्षा आहेर, कु. निलम तरकसबंद या विद्यार्थिनींनी आपली मनोगते सादर केली. कु. दीक्षा आहेर या विद्यार्थिनीने संस्थेला तिच्या वाढदिवसानिमित्त देणगी दिली. डॉ. किंजवडेकर

मेमोरियल फाउंडेशनकडून १८ गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृतीचे वाटप करण्यात आले. पु. वि. गृह माजी विद्यार्थी मंडळाकडून घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. महिला दिनानिमित्त आयोजित स्पर्धेतील विजेत्या महिलांचा सन्मान यावेळी करण्यात आला. या शैक्षणिक वर्षाचा 'आदर्श माता पालक सन्मान' सुनिता पाटील आणि वैशाली शेळके यांना देण्यात आला. या कार्यक्रमास अनुसंधान समिती सदस्य प्रा. कृ. ना. शिरकांडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, ऐरोली माध्यमिक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक तुकाराम नांदुगडे, आयस्कॉनचे अध्यक्ष नंदलाल बॅनर्जी, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी रणजित दीक्षित व किरण देशपांडे, निवृत्त बँक अधिकारी अशोक खंडेलवाल, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ शाखा,नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### मतदान जागृती

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ठाणे लोकसभा मतदार संघ अंतर्गत १५१ - बेलापूर विधानसभा मतदार संघात मतदान जागृती करण्याकरिता विद्याभवन प्राथमिक मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी पथनाट्य व मतदान जागृती रॅली तसेच रांगोळी, वक्तृत्व व पत्रलेखन स्पर्धेतून मतदान करण्याबाबत जनजागृती केली. नवी मुंबई महानगरपालिका शिक्षणाधिकारी श्रीमती अरुणा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृतीचा हा उपक्रम राबविला गेला.

***

# अभियांत्रिकी व धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**संचालक : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती उत्साहात संपन्न

दि. २८ मे २०२४ रोजी थोर स्वातंत्रसेनानी स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. प्राजक्ता देवरे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर हे भारतातील एक महान स्वातंत्रसेनानी, राष्ट्रभक्त , लेखक आणि तत्त्वज्ञ होते. अंदमानात कारावासात असताना सावरकरांनी आपले अजरामर काव्य रचले. अंदमानमधील सेल्युलर जेलमधील भिंतीवर कोरलेले सावरकरांचे राष्ट्रभक्तीपर काव्य आजही त्यांच्या स्मृतींना उजाळा देते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राष्ट्र उन्नतीसाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. या कार्यक्रमास सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. निवृत्ती डावखर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी ग्रंथपाल श्री. संदीप दराडे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

***

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**

**प्र. मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### हनुमान जन्मोत्सव

दि.२३ एप्रिल २०२४ रोजी विद्यालयात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून व श्रीफळ वाढवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी विद्यार्थ्यांना हनुमानाच्या जीवनावरून शारीरिक क्षमतेचे महत्त्व व स्वामीनिष्ठा हे गुण अंगीकारण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी केले तर आभार श्रीमती प्रीती राजपूत यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### महाराष्ट्र दिन व कामगार दिन

दि. १ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत सादर केले. यावेळी अध्यक्षीय मनोगतातून संचालक श्री. अमोल जोशी यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या सर्वाना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना वार्षिक निकालानिमित्त मार्गदर्शन करताना विविध उदाहरणाद्वारे आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी शैक्षणिक गुणवत्तेचे महत्त्व विशद केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. आभार श्री. चेतन गोऱ्हे यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### वार्षिक निकाल

दि.१ मे २०२४ रोजी इ ५ वी ते ९ वी व इ ११ वी या वर्गांचे वार्षिक निकाल जाहीर करण्यात आले. वर्गवार प्रथम विद्यार्थी पुढीलप्रमाणे

| वर्ग | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| ५ अ | मोरे सर्वेश योगेश | ६२५ | ७८.१३ |
| ५ ब | निंबेकर संजीवनी विष्णू | ६६८ | ८४.०० |
| ६ अ | भालेराव स्वरा नवनाथ | ७६४ | ८४.८९ |
| | पगार नूतन नंदकिशोर | ७६४ | ८४.८९ |
| ६ ब | शिंदे ख़ुशी राहुल | ७५१ | ८३.०० |
| ७अ | पगार ज्ञानेश्वरी किशोर | ७६२ | ८५.०० |
| ७ ब | दाते कावेरी विष्णू | ७२४ | ८०.०० |
| | पगार सानवी धनाजी | ७२४ | ८०.०० |
| ८ अ | पगार साक्षी युवराज | ७५८ | ७४.०० |
| ८ ब | पगार ऋतुजा कालिदास | ७९४ | ८८.२२ |
| ९ अ | महाले कार्तिकी भाऊसाहेब | ४५८ | ७६.३० |
| ९ ब | महाले तन्वी पंढरीनाथ | ३४० | ५६.६७ |
| ९ क | बिन्नर दिपाली शरद | ३७६ | ६२.७० |
| ११ अ | ढोन्नर संगिता बाळू | ४९८ | ८३.०० |
| ११ ब | डगळे सविता लहानू | ४८० | ८०.०० |

**सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संचालक श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.**

### संस्था पदाधिकारी भेट

दि. १७ मे २०२५ रोजी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. सुनिल रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर व श्री. अमोल जोशी यांनी विद्यालयास सदिच्छा भेट दिली. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी संस्था पदाधिकारी व संचालकांचे स्वागत केले.

***

## ⁕ विद्या प्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं.), नाशिक ⁕



दि. १ मे २०२४ महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण करताना संचालक श्री. अमोल जोशी समवेत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे आणि पर्यवेक्षक श्री. संजय जोशी



